अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन

**कार्यालयाचे नांव–अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग,**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी–४१३७२२ जि. अहिल्यानगर**

फोन. नं. (०२४२६)-२४३२५९ fstmpkv@gmail.com

जा.क्र.विप्र/अशातंवि/आंबा–प्रशिक्षण/४४ /२०२६ दि.५/०५/२०२६

## परिपत्रक

**विषय : आंबा फळप्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनाबाबत...**

वरील संदर्भिय विषयान्वये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर अंतर्गत अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत आंबा फळप्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन सुशिक्षित बेरोजगारांसाठी करण्यात आलेले आहे. त्याबाबतची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ | प्रशिक्षण शुल्क व इतर तपशील | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण कालावधी | दि. १८ मे ते २२ मे २०२६ (पाच दिवस). |
| २ | शैक्षणिक पात्रता | कमीत कमी १० वी पास/नापास. |
| ३ | प्रशिक्षण शुल्क | दि. १३ मे २०२६ पर्यंत नोंदणीस रु.४,०००/–(चार हजार रुपये मात्र) व तद्नंतर शुल्क रु.४,५००/–(चार हजार पाचशे रुपये मात्र). |
| ४ | प्रशिक्षण ठिकाण | मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि. अहिल्यानगर. |

सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना खालीलप्रमाणे आंब्याचे विविध प्रक्रिया पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

**आंब्याचा गर तयार करणे व साठवण करणे, आंब्यापासून सरबत (आरटीएस) तयार करणे, आंब्याचे सिरप व स्क्वॅश तयार करणे, आंबा पावडर तयार करणे, आंबा पोळी तयार करणे, कैरीपासून आमचूर तयार करणे, कैरीपासून पन्हे तयार करणे, आंब्याचा जॅम तयार करणे, आंब्याचा मुरंबा तयार करणे, कैरीपासून लोणचे तयार करणे.**

याबरोबरच खालील माहिती सुध्दा दिली जाणार आहे.

१. आंबा प्रक्रिया व्यवसाय कसा सुरु करावा?
२. अन्न सुरक्षितता व मानके कायदयाची माहिती आणि प्रक्रिया उद्योगाची नोंदणी कशी करावी?
३. आंबा प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशिनरी व त्यांची देखभाल कशी करावी ?
४. आंबा पदार्थांचे पॅकेजींग आणि मार्केटींग कसे करावे?
५. आंबा प्रक्रिया उद्योगासाठी शासनाच्या कोणत्या कर्ज योजना/अनुदान आहेत?
६. आंबा प्रक्रिया उद्योगातील अडचणी कोणकोणत्या आहेत? त्यावर उपाययोजना काय आहेत?
७. आंबा प्रक्रिया उद्योगाचे व्यवस्थापन कसे करावे ?

तरी इच्छुकांनी प्रमुख, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि. अहिल्यानगर या कार्यालयाशी (०२४२६) २४३२५९ तसेच कार्यालय प्रतिनिधी श्री.राहुल घुगे ९४२१४३७६९८ यांचेशी त्वरीत संपर्क साधावा.

प्रमुख
अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग
म.फु.कृ वि.राहुरी

प्रत–माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. संचालक, संशोधन, मफुकृवि, राहुरी.
२. मा.अधिष्ठाता(कृषि)तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
३. मा. संचालक, विस्तार शिक्षण, मफुकृवि,राहुरी.
४. मा.सहयोगी अधिष्ठाता (पम), मफुकृवि, राहुरी.
५. मा. सहयोगी अधिष्ठाता(निकृशि),मफुकृवि,राहुरी.
६. मा.सहयोगी अधिष्ठाता,डॉ.अ.शिं.कृ.अ.महा.,मफुकृवि, राहुरी.
७. मा. विभाग प्रमुख,(सर्व), मफुकृवि, राहुरी.
८. मा. कुलसचिव, मफुकृवि, राहुरी.
९. मा. नियंत्रक,मफुकृवि, राहुरी.
१०. मा. विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी